पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या प्रशिक्षणाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअर व गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' या विषयावर हे एकदिवसीय प्रशिक्षण होणार आहे. शुक्रवार, दि. २१ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सकाळी दहा ते पाच या वेळेत हे प्रशिक्षण होणार आहे, अशी माहिती डॉ. राजन पडवळ यांनी दिली.

पुढारी

# 'ग्रामीण विकासामध्ये प्राथ. कृषी पतसंस्थांची भूमिका'वर प्रशिक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन व गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२१ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सकाळी दहा ते पाच या वेळेत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायटींच्या कर्मचाऱ्यांसाठी हे प्रशिक्षण होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअरचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी दिली आहे.

20 APR 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांचा 'प्रवेश' सुकर

## शिवाजी विद्यापीठात दहा टक्के जागा राखीव, इंडस्ट्रियल कोट्याची व्याप्ती वाढली

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : सीमाभागातील विद्यार्थ्यांचा शिवाजी विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर शिक्षणासाठीच्या प्रवेशाचा मार्ग सुकर झाला आहे. या विद्यार्थ्यांना प्रवेशित होण्यासाठी त्यांच्याकरिता दहा टक्के जागा राखीव ठेवल्या जात आहेत. या वर्षीपासून इंडस्ट्रियल स्पॉन्सर कोट्याची व्याप्ती वाढवून त्यात विविध अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

सीमाभागामध्ये ८६५ गावे आहेत. तेथील बारावी आणि पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातून उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले. ते लक्षात विद्यापीठाने या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने त्यांच्यासाठी कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशात



दहा टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेवून त्याची कार्यवाही सुरू केली. त्याचा चांगला परिणाम झाला असून गेल्यावर्षी सीमाभागातील सुमारे २०० विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांना विद्यापीठात प्रवेशित झाले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात उद्योगांचे प्रमाण अधिक आहे. विविध औद्योगिक वसाहतींमधील उद्योजकांच्या कंपन्यांमधील कामगारांना त्यांची शैक्षणिक अर्हता वाढविता यावी या उद्देशाने प्रवेशात किमान दोन टक्के इंडस्ट्रीयल स्पॉन्सर कोटा विद्यापीठाने ठेवला आहे. याअंतर्गत फूड सायन्स, केमिस्ट्री, पर्यावरणशास्त्र, आदी काही अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाकरिता जागा राखीव ठेवल्या जात होत्या. यावर्षीपासून पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांकरिता कोटा लागू राहणार आहे.

### विविध ६४ अभ्यासक्रमांसाठी सवलत

- विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर अशा विविध ६४ अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. त्यात प्रवेश परीक्षा होणाऱ्या आणि विनाप्रवेश परीक्षा प्रवेश दिला जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी सीमाभागातील आणि इंडस्ट्रियल कोट्याअंतर्गत प्रवेश होणाऱ्या विद्यार्थ्यांना राखीव जागांची सवलत उपलब्ध आहे.

### यंदा ८ मेपासून प्रवेश परीक्षा

- विद्यापीठातील विविध २५ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते. यंदा ८ ते ११ मेदरम्यान प्रवेश परीक्षा होणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया २८ मार्चपासून सुरू झाली.

> सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने त्यांच्यासाठी दहा टक्के जागा विद्यापीठ राखीव ठेवत आहे. उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काम करणाऱ्यांना त्यांची शैक्षणिक अर्हता वाढविता यावी, यासाठी इंडस्ट्रीयल स्पॉन्सर कोट्यातून प्रवेशाची सुविधा उपलब्ध करून दिली. या दोन्ही प्रवेश सवलतींना चांगला प्रतिसाद मिळत आहे.
>
> **-डॉ. विलास शिंदे**, प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

सकाळ

# 'शिवस्पदंन'मधील खेळाडूंचा ॲथलेटिक्स स्पर्धेत कस

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी खेळाडूंसाठी आयोजित शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ॲथलेटिक्स स्पर्धा झाल्या. त्यात खेळाडूंचा कस लागला.

या ॲथलेटिक्समधील १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ४ बाय १०० मीटर मिक्स रिले, गोळा फेक, लांबउडी स्पर्धा झाली. स्पर्धांचे उद्‌घाटन डॉ. आर. व्ही. गुरव, नीलंबरी जगताप आदींच्या उपस्थितीत झाले. या क्रीडा महोत्सवातील क्रिकेट, बुद्धिबळ, बॉक्सिंगमधील स्पर्धांमधील उपांत्यफेरीतील सामने होणार असल्याचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# ॲथलेटिक्सची आज सेमीफायनल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ३७ अधिविभागांमधील शिवस्पंदन क्रीडा महोत्सवातील ॲथलेटिक्स स्पर्धेच्या प्रथम फेरीसाठी ७०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये शंभर, दोनशे आणि चारशे मिटर धावणे, मिक्स रिले आणि गोळाफेक या क्रीडा प्रकाराची प्रथम फेरी झाली. या फेरीतून सेमीफायनलसाठी प्रत्येक क्रीडा प्रकारातील १६ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. आज (दि. २०) सकाळी ७ वाजता सेमीफायनल होणार असून यातून फायनलसाठी ८ खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. तर सायंकाळी ४ वाजता फायनल होईल. शिवाजी विद्यापीठात प्रीकॉर्टर क्रिकेट स्पर्धा झाली. पुरुष गटातून सोहम कसबेकर (डिपार्टमेंट ऑफ इन्व्हारमेंटल सायन्स) प्रथम, जयेश बागुल (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) व्दितीय. राहूल लोखंडे (डिपार्टमेंट ऑफ झुलॉजी) तृतीय क्रमांक पटकावला. महिला गटात प्रतिक्षा गोसावी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉ लॉजी) प्रथम, श्रध्दा साळुंखे (डिपार्टमेंट ऑफ मायक्रोबायोलॉजी) द्वितीय क्रमांक पटकावला. आज सेमीफायनल आणि फायनल स्पर्धा होणार आहे.

Times of India

# Exam application process on at SUK

**Kolhapur:** The online application process for the March - April 2023 summer session exams of Shivaji University Kolhapur (SUK) will start today.

The B.A., B.Com., B.Sc., M.A., M.Com, M.Sc. exams, along with 848 others, will be conducted this summer by the Board of Examinations and Evaluation

The deadline for filing applications will be 29th April, though late applications will be accepted between 3rd and 8th May with a late fee. A third window for accepting forms will be available between 10th and 12th May, with more late charges levied. TNN